
दै. गोदातीर स. दि. ०४/०८/२५

# हेरॉईनसह अंमली पदार्थ जप्त, दोघांना पोलीस कोठडी; विमानतळ पोलिसांची कारवाई

**नांदेड (प्रतिनिधी)**– शहराच्या विमानतळ पोलीस ठाण्याच्या हद्दीत नमस्कार चौक परिसरात हेरॉईनसह अन्य नशेली पदार्थ विनापरवाना विक्री करणाऱ्या दोघांना अटक करण्यात आली आहे. त्यांच्याकडून ६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करून विमानतळ ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यापूर्वी या शहरात गांजा, पापिस्ट्रा पावडर असे अंमली पदार्थ विकल्या जात होते. आता तर चक्क हेरोईन व घातक अंमली पदार्थ विक्री होत असल्याने नांदेड शहर हे अंमली पदार्थांचे माहेरघर होत आहे की काय? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.



पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार आणि अतिरिक्त पोलीस अधीक्षक सुरज गुरव यांनी शहर व जिल्ह्यात अंमली पदार्थ विक्री करणाऱ्यांच्या मुसक्या आवळण्याच्या सूचना प्रभारी अधिकारी यांना आदेशित केले होते. त्या अनुषंगाने विमानतळ ठाण्याचे नूतन पोलीस निरीक्षक चितांबर कामठेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांच्या गुन्हे शोध पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी ठाण्याच्या हद्दीत गस्त घालण्यास सुरुवात केली. दि. ६ ऑगस्ट रोजी मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे इंडियन पेट्रोल पंप, नमस्कार चौक येथे जावून कारवाई केली. यावेळी गुरुबिरसिंघ हरपालसिंघ (वय ५५ वर्ष, रा. नमस्कार चौक), जगजितसिंघ अवतारसिंघ गिल (वय ४० वर्षे, रा. गुरुव्दारा गेट क्रमांक २) नांदेड हे विनापरवाना बेकायदेशीररित्या एन.डी.पी.एस. ॲक्टच्या तरतुदीचे भंग करुन अंमली पदार्थ हेरॉईन ०७.३१ ग्रॅम एक पॅकेट व Pregalab-३०० चे सहा पॅकेट असा एकूण किंमत ६ हजार ७०१ रुपयाचा मुद्देमाल लोकांना विक्री करण्यासाठी ताब्यात बाळगलेले मिळून आले. मिळालेला मुद्देमाल जप्त करुन गुन्हा दाखल करण्यात आला. आरोपी यांना अटक करुन न्यायालयात हजर केले असता न्यायालयानी आरोपींना एका दिवसाची पोलीस कोठडी देण्यात आली आहे. वरील पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी केलेल्या कामगिरीचे पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी कौतुक केले आहे.